# 'दूरशिक्षण'चे योगदान

कोल्हापूर : 'अनेकांना विविध कारणांमुळे शिक्षण घेता येत नाही अशांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे काम दूरशिक्षण केंद्र करीत आहे. यामुळे वंचित घटकांच्या शिक्षणासाठी दूरशिक्षण केंद्राचे योगदान महत्त्वाचे आहे,' असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी केले. ते ७७ अभ्यास केंद्रांवर कार्यरत असणाऱ्या समन्वयक व लेखनिक यांच्यासाठी आयोजित केलेल्या प्रवेश प्रक्रिया मार्गदर्शन कार्यशाळेत प्रमुख पाहुणे बोलत होते. शिवाजी विद्यापीठाचे लेखाधिकारी आय. टी. विभागाचे अमोल अडगुळे यांनी ऑनलाइन फॉर्ममधील विषय निवड व कोड निवड यासंदर्भात माहिती दिली.

# वंचितांच्या शिक्षणासाठी दूरशिक्षणचे महत्त्वपूर्ण योगदान

– महेश काकडे

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** वंचित घटकांना विविध कारणांमुळे शिक्षण घेता येत नाही. अशांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे काम दूरशिक्षण केंद्र करत आहे. यामुळे वंचित घटकांच्या शिक्षणासाठी दूरशिक्षण केंद्राचे योगदान महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी केले.

दूरशिक्षण केंद्राच्या ७७ अभ्यास केंद्रांवर कार्यरत असणाऱ्या समन्वयक व लेखनिक यांच्यासाठी आयोजित केलेल्या प्रवेश प्रक्रिया मार्गदर्शन कार्यशाळेत ते बोलत होते.

काकडे म्हणाले की, प्रतिकूल परिस्थितीला अनुकूल परिस्थिती निर्माण करून ध्येयप्राप्तीसाठी खडतर



प्रवास करणाऱ्यांना दूरशिक्षण केंद्र शिक्षणाची संधी उपलब्ध करून देत आहे, ही बाब कौतुकास्पद आहे. तसेच जगभरातील छोटी राष्ट्रे येणाऱ्या भविष्यकाळात दूरशिक्षण पद्धतीला महत्त्व देणार आहेत.

यावेळी दूरशिक्षण केंद्राचे संचालक प्रा. डॉ. एम. ए. अनुसे प्रास्ताविक करताना म्हणाले की, अभ्यास केंद्रांनी प्रवेश, परीक्षा, स्वाध्याय, संपर्कसत्रे याबाबतीत वेळेचे व्यवस्थापन व सकारात्मक दृष्टिकोन महत्त्वाचा आहे, असे सांगितले. दूरशिक्षण केंद्राचे उपकुलसचिव डॉ. एन. जे. बनसोडे यांनी आभार मानले.

या कार्यशाळेसाठी शंभरहून अधिक समन्वयक व लेखनिक उपस्थित होते. या कार्यशाळेमध्ये तांत्रिक सत्रामध्ये कोअर इन्फोटेकचे सुभाष कोकरे यांनी ऑनलाईन फॉर्म करणेबाबतची माहिती दिली. शिवाजी विद्यापीठाचे लेखाधिकारी प्रमोद पेटकर, अंतर्गत लेखापरीक्षक अजित चैगुले यांनी ऑनलाईन पेमेंटबद्दल माहिती दिली. तसेच आयटी विभागाचे अमोल अडगुळे यांनी ऑनलाईन फॉर्ममधील विषय निवड आणि कोड निवड यासंदर्भात माहिती दिली.

तसेच प्रवेश प्रक्रियेबदल सांगली विभागीय समन्वयक डॉ. के. बी. पाटील आणि डॉ. आर. यू. संकपाळ यांनी 'स्वयम' कोर्सबदल माहिती दिली. या सत्राचे आभार सातारा विभागीय केंद्राचे समन्वयक डॉ. एस. एल. गायकवाड यांनी मानले, तर सूत्रसंचालन डॉ. पी. एस. लोंढे यांनी केले.

31 JUL 2019
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या अकाऊंटमध्ये 'डिपॉझिट'ची वाढ

## प्रयोगशाळा अनामत रकमेच्या रिफंडचा विद्यार्थ्यांना विसर : गेल्या दोन वर्षात विद्यापीठाच्या खात्यावर १५ लाख १७ हजार ८५५ रुपये जमा

अहिल्या परकाळे
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत सामाजिक शास्त्र आणि विज्ञान शाखांच्या २१ विभागांत विद्यार्थ्यांकडून ५० ते ५०० रूपये पर्यंत प्रयोगशाळा अनामत (डिपॉझिट) रक्कम आकारली जाते. दरवर्षी सरासरी ७ लाख ७१ हजार ७३० रूपये एवढी अनामत रक्कमेची भर विद्यापीठाच्या खात्यात जमा होते. मात्र शैक्षणिक वर्षाच्या अखेरीस ही अनामत रक्कम परत घेण्यास विद्यार्थ्यांना विसर पडतो. त्यामुळे लाखो रुपये विद्यापीठाच्या खात्यावर जमा होतात. गेल्या दोन वर्षात १५ लाख १७ हजार ८५५ जमा झाले. त्यापैकी ८ लाख ३९ हजार ११४ रूपयांचे वाटप झाले आहे. तर अद्याप ६ लाख ७८ हजार ९४१ रुपये जमा असून अनामत घेण्यासाठी विद्यार्थी फिरकले नाहीत.

शिवाजी विद्यापीठात दोन वर्ष पूर्ण केल्यानंतर पुढील करिअरची काळजी आणि घरी जाण्याच्या आनंदात या अनामत रक्कमेचा विद्यार्थांना विसर पडतो. त्यामुळे गेल्या दोन वर्षाचा आढावा घेतला असता १५ लाख १७ हजार ८५५ रूपये विद्यापीठ खात्यावर अनामत रक्कम जमा झाली आहे. त्यापैकी ८ लाख ३९ हजार ११४ रूपये विद्यार्थ्यांना परत केले आहेत. पण विद्यार्थ्यांची मागणीच नसल्याने ६ लाख ७८ हजार ९४१ रूपये विद्यापीठाकडे अद्याप जमा आहेत. सहा महिन्याच्या आत अर्ज करावा, असा नियम आहे. विद्यार्थ्यांच्या दुर्लक्षामुळे ही रक्कम विद्यापीठाकडे पडून राहते, दोष मात्र प्रशासनाला दिला जातो. पदव्युत्तरचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना नियम समजून सांगण्याची आवश्यकता नसते, कारण सध्या ऑनलाईन सर्व माहिती उपलब्ध होते. तसेच पदव्युत्तर विभागात विद्यार्थी गेले तर त्यांना मार्गदर्शन केले जाते. मात्र विद्यार्थी तेवढी तसदीदेखील घेत नसल्याने ही रक्कम विद्यापीठाकडे पडून राहते.

शिवाजी विद्यापीठातील २१ विभागातील प्रथम वर्षाच्या प्रवेश शुल्कातून प्रयोगशाळा व ग्रंथालयासाठी अनामत रक्कम आकारली जाते. एखादा प्रयोग करताना प्रयोगशाळेतील वस्तूंची मोडतोड होवू शकते. किंवा एखादे पुस्तकही गहाळ होवू शकते. विद्यापीठाचे होणारे नुकसान विद्यार्थ्यांनी भरलेल्या अनामत रक्कमेतून घेतले जाते. म्हणून वर्षाकाठी ५० ते ५०० रूपयांपर्यंत अनामत रक्कम भरून घेतली जाते. पण नुकसान झाले नसेल तर विद्यार्थ्यांनी नोडयूजच्या वेळी अनामत रक्कम मिळावी म्हणून अर्ज केला तर विद्यार्थ्यांना सर्व रक्कम परत मिळते. पण काही विद्यार्थी अर्जच करीत नाहीत. त्यामुळे त्यांची अनामत रक्कम विद्यापीठाच्या खात्यात जमा होते. एखादा विद्यार्थी दिलेल्या वेळेनंतर अनामत रक्कम मागण्यासाठी विद्यापीठात जातो तेंव्हा त्याला ही रक्कम मिळत नसल्याचे सांगितले जाते. विद्यार्थी मात्र विद्यापीठ प्रशासनाला दोष देतात. विद्यापीठानेही अनामत रक्कमेसंदर्भात प्रवेशावेळीच मार्गदर्शन करण्याची गरज आहे, अशी चर्चा विद्यापीठ वर्तुळात आहे.

### गेल्या दोन वर्षात जमा झालेली अनामत रक्कम

| साल | | रक्कम |
|---|---|---|
| २०१७-१८ | जमा झालेली अनामत रक्कम | ७७१७३० |
| | विद्यार्थ्यांना दिलेली रक्कम : | ६६४०६४ |
| | मागणी नसल्याने उर्वरित रक्कम | १०७६६६ |
| २०१८-१९ | जमा झालेली अनामत रक्कम | ७४६१२५ |
| | विद्यार्थ्यांना दिलेली रक्कम | १७५०५० |
| | मागणी नसल्याने उर्वरीत रक्कम | ५७१०७५ |

### विविध विषयांच्या प्रयोगशाळेची रक्कम

| विषय | अनामत रक्कम |
|---|---|
| एमए सायकॉलॉजी | ०५० |
| एमएससी केमेस्ट्री, बायोकेमेस्ट्री, | ०५० |
| इलेक्ट्रॉनिक्स पार्ट १ | |
| एमएससी मॅथॅमॅटिक्स जियोग्राफी, स्टॅटिक्स | ०५० |
| एमएससी बॉटनी, झूलॉजी, फिजिक्स | ०५० |
| एमएससी मायक्रोबायोलॉजी पार्ट १ | ५०० |
| एमएससी ॲग्रीकेमिकल पेस्ट मॅनेजमेंट पार्ट १ | ५०० |
| एमएससी एनव्हारमेंटल सायन्स १ | ५०० |
| एमएससी इंडस्ट्रीयल केमेस्ट्री १ | ५०० |
| एमएससी अप्लायड केमेस्ट्री १ | ५०० |
| एमएससी कॉम्प्युटर सायन्स १ | ५०० |
| एमसीए सायन्स १ | ५०० |
| एमएससी बायोटेक्नॉलॉजी पार्ट १ | ५०० |
| एमएससी एन्व्हारमेंटल बायोटेक्नॉलॉजी पार्ट १ | ५०० |
| एमएससी टेक्नॉलॉजी मॅथॅमॅटिक्स पार्ट १ | ५०० |
| एमएससीफूड सायन्स ॲन्ड टेक्नॉलॉजी पार्ट १ | ५०० |
| एमएससी अप्लायड स्टॅटिक्स ॲन्ड इन्फर्मेशन पार्ट १ | ०५० |
| बी. लिप | २०० |
| एम. ईडी | ०५० |
| बीएससी–एमएससी नॅनो सायन्स | ५०० |
| एमएससी नॅनो सायन्स | ५०० |

### विद्यार्थ्यांमध्ये जनजागृतीची गरज

द्वितीय वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर नोड्यूज करताना प्रयोगशाळेची अनामत रक्कम मिळावी म्हणून विद्यार्थ्यांनी पूरक कागदपत्रासह विहीत नमुन्यातील मागणी अर्ज अधिविभागामार्फत पदव्युत्तर विभागाकडे सादर करावा लागतो. त्यानंतर विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर रक्कम जमा होते. मात्र यासंदर्भात बऱ्याच विद्यार्थ्यांना माहिती नसल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्याची गरज.

### विद्यार्थ्यांचे पैसे परत देण्यासाठी विद्यापीठ प्रयत्नशील

विद्यापीठाकडून प्रयोगशाळा व ग्रंथालयाची अनामत रक्कम घेतली जाते. विद्यार्थ्यांनी अर्ज न केल्याने काही रक्कम विद्यापीठाकडे आहे. ज्यांची रक्कम आहे त्यांनी नियमांचे पालन करीत विहीत नमुन्यात अर्ज करावा. यंदा अधिविभागप्रमुखांच्या बैठकीत निरोप विद्यार्थ्यांच्या समारंभात अनामत रक्कम मिळावी म्हणून अर्ज भरण्याच्या सूचना दिल्या जाणार आहेत.

प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के (शिवाजी विद्यापीठ)



पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात लेफ्टनंट कर्नल संजीव सरनाईक यांचे स्वागत करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे आदी. (छाया : नाज ट्रेनर)

# लेफ्टनंट कर्नल सरनाईक यांची शिवाजी विद्यापीठास सदिच्छा भेट

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

राष्ट्रीय छात्र सेनेच्या (एनसीसी) 'वन-महाराष्ट्र'चे कमांडंट लेफ्टनंट कर्नल संजीव सरनाईक यांनी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांची सदिच्छा भेट घेतली.

विद्यापीठाच्या राष्ट्रमाता जिजाऊसाहेब सभागृहात एनसीसीच्या सुमारे ४५० विद्यार्थ्यांसाठी थलसेनापूर्व व संयुक्त वार्षिक कॅम्प झाला. यावेळी कॅम्प कमांडंट म्हणून ले. कर्नल सरनाईक उपस्थित होते. ले. कर्नल सरनाईक यांनी कुलगुरू डॉ.देवानंद शिंदे यांची त्यांच्या दालनात सदिच्छा भेट घेतली. विद्यापीठ एनसीसीसाठी देत असलेल्या सहकार्याबद्दल धन्यवाद दिले.

यावेळी ऑनररी मेजर डॉ. रूपा शहा, एनसीसीच्या प्रशासन अधिकारी गुगा मालती (तामिळनाडू) उपस्थित होत्या.

पुढारी

# ‘कोल्हापुरी’ला आंतरराष्ट्रीय स्तरावर नेण्यासाठी विद्यापीठ प्रयत्नशील

## कुलगुरू डॉ. शिंदे; कोल्हापुरी चप्पल क्लस्टरसमवेत सामंजस्य करार



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात कोल्हापुरी चप्पल क्लस्टरसमवेत झालेल्या सामंजस्य कराराप्रसंगी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. विलास नांदवडेकर, अरुण सातपुते. व्ही. टी. पाटील, नितीन देसाई, डॉ. ए. एम. गुरव, उपमहापौर भूपाल शेटे, महेश काकडे आदी. (छाया : नाज ट्रेनर)**

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कोल्हापुरी चप्पलला आंतरराष्ट्रीय स्तरावर नेण्याच्या दृष्टीने शिवाजी विद्यापीठ कोल्हापुरी चप्पल क्लस्टरला सर्वतोपरी सहाय्य करेल, अशी ग्वाही कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी दिली.

शिवाजी विद्यापीठ कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र व कोल्हापुरी चप्पल क्लस्टर समूह यांच्यात गुरुवारी सामंजस्य करार करण्यात आला. याप्रसंगी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आणि अरुण सातपुते यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केल्या. उपमहापौर भूपाल शेटे, प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, ज्येष्ठ कलादिग्दर्शक नितीन चंद्रकांत देसाई यांची प्रमुख उपस्थिती होती.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, कोल्हापुरी चप्पल दर्जेदार आहे. चप्पलला कालसुसंगत असे आधुनिक रूप प्रदान करण्यासाठी संशोधन, तंत्रज्ञान विकास, पणन व व्यवस्थापन आणि कौशल्य निर्मिती या चार आघाड्यांवर विद्यापीठ सक्रियपणे मदत करेल. त्या दृष्टीने हा सामंजस्य करार उपयुक्त ठरणार आहे. क्लस्टरचे अध्यक्ष उपमहापौर भूपाल शेटे म्हणाले, कोल्हापूर चप्पलच्या निर्मितीमध्ये सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या कारागिरांवर पारंपरिक स्वरूपाची अनेक बंधने आहेत. कोल्हापुरी चप्पलला तिचे पूर्ववैभव मिळवून देण्यासाठी क्लस्टर प्रयत्नशील आहे. कोल्हापुरी चप्पलबरोबरच कोल्हापुरी शूजसुद्धा लोकप्रिय करण्यासाठी प्रयत्न करणार आहोत. कोल्हापुरी चप्पलचा ब्रँड कर्नाटकात नेण्याचे काही लोकांचे प्रयत्न सुरू आहेत, त्यामुळे कोल्हापुरी चप्पलला जी. आय. मिळविण्याचे प्रयत्न आहेत. विद्यापीठाकडून सहकार्य अभिप्रेत आहे. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, वित्त व लेखाधिकारी व्ही.टी. पाटील, कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राचे समन्वयक व अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव, महेश चव्हाण आदी उपस्थित होते.

दरम्यान, कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राच्या संकल्पनेतून साईप्रसाद बेकनाळकर यांनी साकारलेल्या ‘शिवबा’ या क्राफ्ट बुकचे प्रकाशन झाले. ‘शिवबा’ हे क्राफ्ट बुक शिवाजी महाराजांच्या आयुष्यातील प्रसंगांवर बेतलेले आहे. गड-किल्ल्यांच्या निर्मितीसह अनेक अभिनव उपक्रम यात विद्यार्थ्यांसाठी आहेत.

# राज्यस्तरीय रग्बीत कोल्हापूरला विजेतेपद

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

नागपूर येथे झालेल्या राज्यस्तरीय वरिष्ठ गट रग्बी स्पर्धेत मुलांच्या व मुलींच्या संघाने प्रथम क्रमांक पटकावला. विजेत्या खेळाडूंचा सत्कार शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, क्रीडा विभागप्रमुख पी. टी गायकवाड व प्रशिक्षक दीपक पाटील यांच्या हस्ते करण्यात आला.



**कोल्हापूर : रग्बी स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावलेल्या मुलांच्या व मुलींच्या संघातील खेळाडूंचा सत्कार कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, डॉ. डी. टी शिर्के यांच्या हस्ते करण्यात आला. सोबत पी. टी गायकवाड, दीपक पाटील.**

मुलांच्या संघात श्रीधर निगडे, पृथ्वीराज पाटील, विनायक पोवार, रोहित मुद्राळे, हर्षद मोरबाळे, संकेत पाटील, स्वप्निल पाटील, तुषार पाटील, भैरवनाथ पाटील, रामनाथ पाटील, मयुरेश पाटील, स्वप्निल पाटील, सुहास पाटील तर मुलींच्या संघात नीलम देसाई, पूजा कुंभार, शुभांगी गावडे, शीतल शिनगारे, सोनाली साळवी, कल्याणी पाटील, वैष्णवी जामदार, आकांक्षा ठाणेकर, प्रियांका पाटील, पूजा कळंत्रे, वर्षा माने यांचा समावेश होता.

खेळाडूंना खासदार संभाजीराजे छत्रपती, माजी आमदार मालोजीराजे छत्रपती, अमर सासने, अजित पाटील, प्रशिक्षक दीपक पाटील, शिवाजी मोहिते यांचे मार्गदर्शन लाभले.

# रग्बी खेळाडूंचा विद्यापीठात सत्कार

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

राज्य स्तरीय वरिष्ठ गट रग्बी स्पर्धेत कोल्हापूरच्या मुलांच्या आणि मुलींच्या संघाने यश संपादन केले. या संघातील खेळाडूंचा शिवाजी विद्यापीठाचे दि. ६ व ७ जुलै रोजी नागपूर येथे झालेल्या राज्यस्तरीय वरिष्ठ गट रग्बी स्पर्धेत मुलांच्या संघांने सलग तिसऱ्यांदा प्रथम क्रमांक संपादन करुन रग्बी या खेळातील आपला दबदबा कायम ठेवला. तसेच मुलींच्या संघांनेही प्रथम क्रमांक संपादन करुन आपले रग्बी या खेळातील आपली नवी ओळख तयार केली.

सर्व विजयी खेळाडूंचा सत्कार शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी विद्यापीठाचे प्र.कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, क्रीडा विभाग प्रमुख पी. टी. गायकवाड व प्रशिक्षक दीपक पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.



**कोल्हापूर : विजेत्या रग्बी संघासोबत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आदी.**

मुलांच्या विजयी संघामध्ये - श्रीधर निगडे, पृथ्वीराज पाटील, विनायक पोवार, रोहीत मुद्राळे, हर्षद मोरबाळे, संकेत पाटील, स्वप्नील पाटील, तुषार पाटील, भैरवनाथ पाटील, रामनाथ पाटील, मयुरेश पाटील, स्वप्नील पाटील, सुहास पाटील. तर मुलींच्या संघामध्ये - निलम पाटील, पुजा कुंभार, शुभांगी गावडे, शितल शिणगारे, सोनाली साळवी, कल्याणी पाटील, वैष्णवी देसाई, वैष्णवी जामदार, आकांक्षा ठाणेकर, प्रियांका पाटील, पूजा कळंत्रे, वर्षा माने यांचा समावेश होता. या खेळाडूंना खा. छत्रपती संभाजी राजे, पेट्रन इन चिफ छत्रपती मालोजीराजे, कोल्हापूर जिल्हा रग्बी असोसिएशनचे अध्यक्ष अमर सासने, अजित पाटील, प्रशिक्षक दीपक पाटील, शिवाजी मोहिते यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन मिळाले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, ...
1? JUL 2019
तरुण भारत

# कोल्हापुरी चप्पल क्लस्टरबरोबर विद्यापीठाचा करार

## कोल्हापुरी चप्पलला आंतरराष्ट्रीय स्तरावर नेण्यासाठी प्रयत्न

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

कोल्हापूरी चप्पलला आंतरराष्ट्रीय स्तरावर घेऊन जाण्याच्या दृष्टीने शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर चप्पल क्लस्टरला सर्वोतोपरी सहाय्य करील, अशी ग्वाही कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी दिली.

शिवाजी विद्यापीठाचे कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र आणि कोल्हापूरी चप्पल क्लस्टर समूह यांच्यात गुरूवारी सामंजस्य करार केला. यावेळी उपमहापौर भूपाल शेटे, प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के आणि ज्येष्ठ कलादिग्दर्शक नितीन देसाई यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, कोल्हापुरी चप्पलला कालसुसंगत असे आधुनिक रुप प्रदान करण्यासाठी संशोधन, तंत्रज्ञान विकास आणि कौशल्य निर्मिती या चार आघाड्यांवर विद्यापीठ सक्रियपणे मदत करील. त्या दृष्टीने हा सामंजस्य करार उपयुक्त ठरणार आहे.

उपमहापौर तथा क्लस्टरचे अध्यक्ष भूपाल शेटे म्हणाले, कोल्हापूर चप्पलच्या निर्मितीमध्ये



**कोल्हापूर : सामंजस्य कराराप्रसंगी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्यासह कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, क्लस्टरचे अरुण सातपुते. सोबत व्ही. टी. पाटील, दिग्दर्शक नितीन देसाई आदी मान्यवर.**

सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या कारागिरांवर पारंपरिक स्वरुपाची अनेक बंधने आहेत. त्या बंधनात राहून ते कोल्हापुरी चप्पलचा दर्जा आणि वैभव जपण्यासाठी कार्यरत आहेत. त्यामुळे कोल्हापुरी चप्पलला तिचे पूर्ववैभव मिळवून देण्यासाठी क्लस्टर प्रयत्नशील आहे. कोल्हापुरी चप्पलच्या बरोबरीनेच कोल्हापुरी शूज सुद्धा लोकप्रिय करण्यासाठी प्रयत्न करावयाचे आहेत. कोल्हापुरी चप्पलचा ब्रँड कर्नाटकात नेण्याचे काही लोकांचे प्रयत्न सुरू आहेत. पण क्लस्टर ते प्रयत्न यशस्वी होवू देणार नाही. यावेळी सामंजस्य करारावर कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आणि अरुण सातपुते यांनी स्वाक्षरी केल्या. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, वित्त व लेखाधिकारी व्ही.टी. पाटील, कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राचे समन्वयक व अधिष्ठाता डॉ. ए.एम. गुरव, महेश चव्हाण उपस्थित होते.

### 'शिवबा' क्राफ्ट बुकचे प्रकाशन

विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राच्या संकल्पनेतून साईप्रसाद बेकनाळकर यांनी साकारलेल्या 'शिवबा' या क्राफ्ट बुकचे प्रकाशन कुलगुरू डॉ. शिंदे, कला-दिग्दर्शक नितीन देसाई आणि मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. हे क्राफ्ट बुक शिवाजी महाराजांच्या आयुष्यातील प्रसंगांवर आधारीत असून गड-किल्ल्यांच्या निर्मितीसह अनेक अभिनव उपक्रम यामध्ये आहेत. या पुस्तकात २३ महनीय व्यक्तींवर आधारीत क्राफ्ट बुकच्या निर्मितीचा हा प्रकल्प आहे.

# वरिष्ठ गट रग्बी स्पर्धेत जिल्ह्यास दुहेरी विजेतेपद

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता : १२ : राज्यस्तरीय वरिष्ठ गट रग्बी स्पर्धेत कोल्हापूर जिल्हा मुलांच्या आणि मुलींच्या रग्बी फुटबॉल संघांनी प्रथम क्रमांक मिळवला. ही स्पर्धा ६ ते ७ जुलै दरम्यान नागपूर येथे झाली. यशाबद्दल शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी विजेत्या संघांचा सत्कार केला. याप्रसंगी विद्यापीठस्तरीय मुलांच्या रग्बी संघाबरोबरच मुलींचा संघही तयार करण्याची ग्वाही त्यांनी दिली. प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, क्रीडा विभागप्रमुख पी. टी. गायकवाड आदी उपस्थित होते. मुलांच्या संघाने या स्पर्धेमध्ये हे सलग तिसरे जेतेपद मिळवले आहे. तर मुलींच्या संघानेही जेतेपद मिळवत जिल्ह्याचा रग्बी खेळाचा दबदबा राज्यात निर्माण केला आहे.

स्पर्धेत महाराष्ट्रातील २४ जिल्हा संघानी सहभाग घेतला होता. यात मुलांच्या संघाने वर्धा संघाला ०-३०, सिंधदुर्ग ०-२६,ठाणे ०-१७, मुंबई०-४६ या सह मुलींच्या संघाने चंद्रपूर ०-३०,सांगली ०-२५,गोंदिया ० -१७, ठाणे ७-१७ अशा फरकाने विजय मिळवला. मुलांच्या संघामध्ये श्रीधर निगडे, पृथ्वीराज पाटील, विनायक पोवार, रोहित मुद्राळे, हर्षद मोरबाळे, संकेत पाटील, स्वप्नील पाटील, तुषार पाटील, भैरवनाथ पाटील, रामनाथ पाटील, मयुरेश पाटील, स्वप्नील पाटील, सुहास पाटील यांचा समावेश होता. मुलींच्या संघात नीलम पाटील, पूजा कुंभार, शुभांगी गावडे, शीतल शिणगारे, सोनाली साळवी, कल्याणी पाटील, वैष्णवी देसाई, वैष्णवी जामदार, आकांशा ठाणेकर, प्रियांका पाटील, पूजा कळंत्रे, वर्षा माने यांचा समावेश होता. या खेळाडूंना प्रशिक्षक दीपक पाटील यांचे मार्गदर्शन तर कोल्हापूर जिल्हा रग्बी फुटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष अमर सासने यांचे प्रोत्साहन लाभले.



**कोल्हापूर : कोल्हापूर जिल्हा रग्बी फुटबॉल असोसिएशनच्या राज्यस्तरीय विजेत्या महिला आणि पुरुष संघासह शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र.कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, क्रीडा विभागप्रमुख पी. टी. गायकवाड, प्रशिक्षक दीपक गायकवाड.**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
31 JUL 2019
तरुण भारत

# मुलांच्या जिल्हा संघाची हॅट्ट्रिक; मुलींच्या संघालाही अजिंक्यपद

**प्रतिनिधी**

कोल्हापूर

कोल्हापूर जिल्हा मुलांच्या संघाने मुंबई जिल्हा संघाला ४६-० ट्रायने पराभूत करत राज्यस्तरीय वरिष्ठ गट रग्बी स्पर्धेच्या जेतेपदाची हॅट्ट्रिक केली. जिल्हा मुलींच्या संघानेही सातारा संघाला १७-० ट्रायने मात देत जेतेपद मिळविले. नागपूर जिल्हा रग्बी असोसिएशन व महाराष्ट्र राज्य रग्बी असोसिएशन यांच्या वतीने स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

नागपुरातील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाच्या मैदानावर ही स्पर्धा झाली. स्पर्धेत महाराष्ट्रातून मुलांचे २४ तर मुलींचे २२ संघ सहभागी झाले होते. यापैकी मुलांच्या गटातील पहिला सामना खेळताना कोल्हापूर संघाने वर्धा संघाला ३०-० ट्रायने तर दुसऱ्या सामन्यात सिंधुदुर्ग संघाला २६-० ट्रायने पराभव करुन उपांत्य फेरीत प्रवेश केला. उपांत्य सामन्यात कोल्हापूर संघाने ठाणे जिल्हा संघाला हरवून अंतिम फेरीत प्रवेश मिळविला. हा अंतिम सामना मुंबई जिल्हा संघाविरुद्ध झाला. यात कोल्हापूर संघाने मुंबई संघावर ४६-० ट्रायने दणदणीत विजय मिळवून स्पर्धेच्या जेतेपदाची हॅट्ट्रिक साधली.

मुलींच्या गटात कोल्हापूर जिल्हा संघाने चंद्रपूर जिल्हा संघाला ३०-० ट्रायने, दुसऱ्या सामन्यात सांगली संघाला २५-० ट्रायने तर तिसऱ्या सामन्यात गोंदिया संघाला १७-० ट्रायने जिंकून उपांत्य फेरीत प्रवेश केला. उपांत्य सामन्यात ठाणे संघाला तर अंतिम फेरीत सातारा जिल्हा संघाला कोल्हापूर संघाने पराभूत केले.

**विजयी मुलांचा संघ**

श्रीधर निगडे, पृथ्वीराज पाटील, विनायक पोवार, रोहित मुद्राळे, हर्षद मोरबाळे, संकेत पाटील, स्वप्नील पाटील, तुषार पाटील, भैरवनाथ पाटील, रामनाथ पाटील, मयुरेश पाटील, स्वप्नील पाटील, सुहास पाटील.

**विजयी मुलींचा संघ**

निलम पाटील, पूजा कुंभार, शुभांगी गावडे, शितल शिणगारे, सोनाली साळवी, कल्याणी पाटील, वैष्णवी देसाई, वैष्णवी जामदार, आकांक्षा ठाणेकर, प्रियांका पाटील, पूजा कळंत्रे, वर्षा माने.



कोल्हापूर : राज्यस्तरीय वरिष्ठ गट रग्बी स्पर्धेचे जेतेपद मिळविलेल्या कोल्हापूर जिल्हा मुला-मुलींच्या संघांचा कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते सत्कार झाला. यावेळी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. पी. टी. गायकवाड व प्रशिक्षक दीपक पाटील होते.